# जपजी साहिब

अध्यात्माकडे प्रवास
मराठी अनुवाद

SikhBookClub.com

SGGSonline.com

# Index


1. जपजी साहिब ------------------------------------------ 1
2. अर्दास प्रार्थना ------------------------------------------ 35
3. प्रवासासाठी तत्वज्ञान ------------------------------------ 39
4. महिलांची भूमिका --------------------------------------- 41
5. पगडीचे महत्त्व ------------------------------------------ 44
6. आपल्या प्रवासात नम्रता मुख्य सार -------------------------- 46



🙏🙏🙏 We are distributing Free Gutkas, Divine message of the Guru globally in all the major languages, To Continue this Monumental task, please donate at https://sggsonline.com/donation



This Sewa has been done by Sewadars & SikhBookClub.


This text is only a translation and only gives the essence of the Guru's Divine word. For a more complete understanding, please read the Gurumukhi Sri Guru Granth Sahib Ji. If any errors are noticed, please notify us immediately via email at walnut@gmail.com.


Publisher: SikhBookClub.com

**ੴ ਸਤਿ ਨਾਮੁ ਕਰਤਾ ਪੁਰਖੁ ਨਿਰਭਉ ਨਿਰਵੈਰੁ ਅਕਾਲ ਮੂਰਤਿ ਅਜੂਨੀ ਸੈਭੰ ਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥**
ईश्वर हा एकच आहे आणि चराचरात त्याचे अस्तित्त्व शाश्वत आहे. जो सृष्टीचा निर्माता आहे, सर्वव्यापक आहे, भयरहित आहे (निर्भय), ज्याच्यात वैर नाही (निर्वैर), ज्याचे स्वरूप काळाच्या पलीकडचे आहे, (अर्थ- ज्याचे शरीर विनाशापासून मुक्त आहे), जो अयोनी आहे, जो स्वयंभू आहे आणि जो गुरूकृपेमुळे प्राप्त होतो.

**॥ ਜਪੁ ॥**
जप करा. (याला गुरूच्या वाणीत महत्त्वाचे देखील मानली जाते.)

**ਆਦਿ ਸਚੁ ਜੁਗਾਦਿ ਸਚੁ ॥**
निरंकार (ईश्वर) तोच सत्य आहे, एकमेव आहे. जो सृष्टीच्या प्रारंभाच्या आधीपासून सत्य आहे आणि युगाच्या प्रारंभापासून सत्य आहे.

**ਹੈ ਭੀ ਸਚੁ ਨਾਨਕ ਹੋਸੀ ਭੀ ਸਚੁ ॥੧॥**
वर्तमानकाळात आणि येणाऱ्या अनेक युग येऊन निघून गेल्यानंतर सुद्धा ईश्वराचे अस्तित्व राहील. श्री गुरु नानक देव जी यांचे कथन आहे की भविष्यकाळात देखील परमेश्वराचे अस्तित्त्व राहणार आहे. ||१||

**ਸੋਚੈ ਸੋਚਿ ਨ ਹੋਵਈ ਜੇ ਸੋਚੀ ਲਖ ਵਾਰ ॥**
कोणी लाखो वेळा आंघोळ करून शरीर शुद्ध केले तरी त्यामुळे त्याचे मन शुद्ध होत नाही. मनाच्या शुद्धीविना परमेश्वराचा (वाहिगुरु) विचारही करता येत नाही.

**ਚੁਪੈ ਚੁਪ ਨ ਹੋਵਈ ਜੇ ਲਾਇ ਰਹਾ ਲਿਵ ਤਾਰ ॥**
फक्त एकाग्र होऊन शांत समाधी अवस्थेत बसल्याने मन शांत होत नाही, जोपर्यंत तुमच्या मनातून वाईट विचार निघून जात नाही.

**ਭੁਖਿਆ ਭੁਖ ਨ ਉਤਰੀ ਜੇ ਬੰਨਾ ਪੁਰੀਆ ਭਾਰ ॥**
शरीराने उपाशी राहून मनाची भूक कधीच शांत होत नाही. मनाची शांती प्राप्त करण्यासाठी वैकुंठ आणि इंद्रपुरी यातील वैभव सुद्धा कमी आहे.

**ਸਹਸ ਸਿਆਣਪਾ ਲਖ ਹੋਹਿ ਤ ਇਕ ਨ ਚਲੈ ਨਾਲਿ ॥**
एखाद्याच्या मनात लाखो-हजारो चतुर विचार असले तरी ते अहंकाराने युक्त असल्याने ते त्याला परमेश्वराशी एकरूप होण्यास त्याला मदत करत नाही.

**ਕਿਵ ਸਚਿਆਰਾ ਹੋਈਐ ਕਿਵ ਕੂੜੈ ਤੁਟੈ ਪਾਲਿ ॥**
मग प्रश्न हा निर्माण होतो की परमेश्वरासमोर सत्याचा प्रकाश कसा निर्माण होणार? त्याच्या आणि परमेश्वराच्या मध्ये जी असत्याची भिंत आहे ती कशी नष्ट होणार?

**ਹੁਕਮਿ ਰਜਾਈ ਚਲਣਾ ਨਾਨਕ ਲਿਖਿਆ ਨਾਲਿ ॥੧॥**
सत्याचे स्वरूप स्पष्ट करतांना गुरू नानक सांगतात की हे सृष्टीची रचना होण्याआधीपासूनच लिहिले आहे की प्रापंचिक व्यक्ती परमेश्वराच्या आदेशानुसार वागला तर हे सर्व सहजतेने प्राप्त करू शकतो.

**ਹੁਕਮੀ ਹੋਵਨਿ ਆਕਾਰ ਹੁਕਮੁ ਨ ਕਹਿਆ ਜਾਈ ॥**
(सृष्टीतील) प्रत्येक वस्तू परमेश्वराच्या आज्ञेनेच निर्माण झाली आहे, परंतु त्यांच्या वचनांना आपण शब्दाद्वारे व्यक्त करू शकत नाही.

**ਹੁਕਮੀ ਹੋਵਨਿ ਜੀਅ ਹੁਕਮਿ ਮਿਲੈ ਵਡਿਆਈ ॥**
परमेश्वराच्या आज्ञेनेच (या पृथ्वीवर) वेगवेगळ्या योनीमध्ये जीव जन्म घेतात, त्याच्या आज्ञेनेच त्यांना मान-सम्मान ( उच्च किंवा निच स्थान) प्राप्त होतो.

**ਹੁਕਮੀ ਉਤਮੁ ਨੀਚੁ ਹੁਕਮਿ ਲਿਖਿ ਦੁਖ ਸੁਖ ਪਾਈਅਹਿ ॥**
परमेश्वराच्या आज्ञेनेच जीव श्रेष्ठ किंवा निम्न जीवन प्राप्त करतो. त्याच्या लिखित आदेशानेच जीव सुख-दुःखाचा अनुभव घेतो.

**ਇਕਨਾ ਹੁਕਮੀ ਬਖਸੀਸ ਇਕਿ ਹੁਕਮੀ ਸਦਾ ਭਵਾਈਅਹਿ ॥**
परमेश्वराच्या आदेशानुसारच सृष्टीतील अनेक जीवांना आशीर्वाद मिळतात आणि काही जीव त्याच्या आदेशानेच सृष्टीतील ये-जा च्या चक्रात अडकतात.

**ਹੁਕਮੈ ਅੰਦਰਿ ਸਭੁ ਕੋ ਬਾਹਰਿ ਹੁਕਮ ਨ ਕੋਇ ॥**
प्रत्येकजण त्याच्या आज्ञेच्या अधीन आहे; कोणीही त्याच्या आज्ञा त्याच्या आज्ञेबाहेर सृष्टीतील कोणतेही कार्य नाही.

**ਨਾਨਕ ਹੁਕਮੈ ਜੇ ਬੁਝੈ ਤ ਹਉਮੈ ਕਹੈ ਨ ਕੋਇ ॥੨॥**
'हे नानक, जर लोकांना त्याची आज्ञा समजली तर कोणीही अहंकाराने वागणार नाही. हाच अहंकार ऐहिक वैभवात रमलेल्या जीवाला निरंकाराच्या जवळ येऊ देत नाही.

**ਗਾਵੈ ਕੋ ਤਾਣੁ ਹੋਵੈ ਕਿਸੈ ਤਾਣੁ ॥**
(परमेश्वराच्या कृपेनेच) ज्याच्याकडे आध्यात्मिक शक्ती आहे तोच त्याच्या (सर्वशक्तिमान) शक्तीचे गुणगान गाऊ शकतो.

**ਗਾਵੈ ਕੋ ਦਾਤਿ ਜਾਣੈ ਨੀਸਾਣੁ ॥**
काहीजण त्यांनी दिलेल्या भेटवस्तूंना त्यांचा आशीर्वाद मानून त्यांच्या कीर्तीचे गुणगान गातात.

**ਗਾਵੈ ਕੋ ਗੁਣ ਵਡਿਆਈਆ ਚਾਰ ॥**
काही लोक त्याचे अवर्णनीय गुण आणि महिमेचे गुणगान गातात.

**ਗਾਵੈ ਕੋ ਵਿਦਿਆ ਵਿਖਮੁ ਵੀਚਾਰੁ ॥**
काहीजण त्याच्या विद्येच्या माध्यमातून विषम विचारांचे (ज्ञानाचे) गुणगान गातो.

**ਗਾਵੈ ਕੋ ਸਾਜਿ ਕਰੇ ਤਨੁ ਖੇਹ ॥**
काहीजण त्याला परमेश्वराचे रूप, निर्माता आणि संहारक मानून त्याची स्तुती करतात.

**ਗਾਵੈ ਕੋ ਜੀਅ ਲੈ ਫਿਰਿ ਦੇਹ ॥**
काहीजण परमेश्वराचे वर्णन असे करतात की परम शक्ती जीवन देते आणि नंतर ते परत घेते.

**ਗਾਵੈ ਕੋ ਜਾਪੈ ਦਿਸੈ ਦੂਰਿ ॥**
काही जीव त्या निरंकाराला, परमेश्वराला स्वतःपासून दूर समजून त्याचे गुणगान गातात.

**ਗਾਵੈ ਕੋ ਵੇਖੈ ਹਾਦਰਾ ਹਦੂਰਿ ॥**
काही लोक त्याला आपल्या समोर अत्यंत जवळ, दहाही दिशांत अस्तित्त्व मान्य करून त्याची स्तुती गातात.

**ਕਥਨਾ ਕਥੀ ਨ ਆਵੈ ਤੋਟਿ ॥**
अनेक लोकांनी परमेश्वराच्या कीर्तीचे वर्णन केले आहे, परंतु त्याच्या कीर्तीचा अंत नाही.

**ਕਥਿ ਕਥਿ ਕਥੀ ਕੋਟੀ ਕੋਟਿ ਕੋਟਿ ॥**
लाखो लोकांनी त्यांच्या गुणांचे वर्णन केले आहेत, तरीही त्याचे खरे स्वरूप सापडले नाही.

**ਦੇਦਾ ਦੇ ਲੈਦੇ ਥਕਿ ਪਾਹਿ ॥**
अकाल पुरख दाता बनून तो सर्व लोकांना भौतिक पदार्थ (अथकपणे) देत राहतो, (पण) लोक घेताना थकतो.

**ਜੁਗਾ ਜੁਗੰਤਰਿ ਖਾਹੀ ਖਾਹਿ ॥**
सर्व प्राणी युगानुयुगे या पदार्थांचा उपभोग घेत आहेत.

**ਹੁਕਮੀ ਹੁਕਮੁ ਚਲਾਏ ਰਾਹੁ ॥**
आदेश देणाऱ्या निरंकाराच्या इच्छेनेच (संपूर्ण सृष्टी) विशिष्ट मार्गावर विश्व चालतआहे.

**ਨਾਨਕ ਵਿਗਸੈ ਵੇਪਰਵਾਹੁ ॥੩॥**
श्री गुरु नानक देवजी सृष्टीतील सजीवांना सचेत करतांना म्हणतात की निरंकार (वाहेगुरु) कोणतीही चिंता न करता (या जगातील सजीवांवर) नेहमी आनंदी असतात. ॥३॥

**ਸਾਚਾ ਸਾਹਿਬੁ ਸਾਚੁ ਨਾਇ ਭਾਖਿਆ ਭਾਉ ਅਪਾਰੁ ॥**
तो अकाल पुरख (निरंकार) त्याच्या खऱ्या नावानेही सत्य आहे, त्याच्यावर प्रेम करणारेच (खऱ्या आणि खऱ्या नावाने) त्याला अनंत म्हणतात.

ਆਖਹਿ ਮੰਗਹਿ ਦੇਹਿ ਦੇਹਿ ਦਾਤਿ ਕਰੇ ਦਾਤਾਰੁ ॥
(सर्व देव, दानव, मानव आणि प्राणी इ.) जीव म्हणत राहतात, मागत राहतात, (भौतिक वस्तू) दे -दे करत राहतात, तो दाता (परमेश्वर) सर्वांना देत राहतो.

ਫੇਰਿ ਕਿ ਅਗੈ ਰਖੀਐ ਜਿਤੁ ਦਿਸੈ ਦਰਬਾਰੁ ॥
आता प्रश्न पडतो की (जसे इतर राजे आणि महाराजे त्यांच्याकडे काही भेटवस्तू घेऊन जातात तसेच) त्या परिपूर्ण परमेश्वराकडे कोणती भेट न्यावी जेणेकरून त्याचे द्वार सहज दिसेल?

ਮੁਹੌ ਕਿ ਬੋਲਣੁ ਬੋਲੀਐ ਜਿਤੁ ਸੁਣਿ ਧਰੇ ਪਿਆਰੁ ॥
आपण जीभेने त्याची स्तुती कशी करावी जेणेकरून ती स्तुती ऐकल्यावर ती अनंत शक्ती (ईश्वर) आपल्याला प्रेम-प्रसाद देईल?

ਅੰਮ੍ਰਿਤ ਵੇਲਾ ਸਚੁ ਨਾਉ ਵਡਿਆਈ ਵੀਚਾਰੁ ॥
गुरु महाराज ह्यांचे उत्तर स्पष्ट करतात की सकाळी (अमृतवेळी ) (ज्या वेळी माणसाचे मन सामान्यतः सांसारिक गुंतापासून मुक्त असते) अकालपुरुषाचे नामस्मरण करा आणि त्याच्या महिमेचे गुणगान करा. तरच आपण त्याचे प्रेम प्राप्त करू शकतो.

ਕਰਮੀ ਆਵੈ ਕਪੜਾ ਨਦਰੀ ਮੋਖੁ ਦੁਆਰੁ ॥
(त्याचा आशीर्वाद मिळाल्यास) गुरु महाराज स्पष्ट करतात की, केवळ कर्मांने जीवाला हे शरीर रूपी वस्त्र म्हणजेच मनुष्यजन्म मिळते, त्यामुळे मोक्ष मिळत नाही, मोक्ष मिळवण्यासाठी माणसाला त्याची कृपादृष्टी लाभणे आवश्यकता असते.

ਨਾਨਕ ਏਵੈ ਜਾਣੀਐ ਸਭੁ ਆਪੇ ਸਚਿਆਰੁ ॥੪॥
हे नानक! याप्रकारे बोधग्रहण करा की ते सत्य स्वरूप, निराकार हेच सर्वस्व आहे, यामुळे मनुष्याच्या सर्व शंका दूर होतील.॥ ४॥

ਥਾਪਿਆ ਨ ਜਾਇ ਕੀਤਾ ਨ ਹੋਇ ॥
त्या परमेश्वराला मूर्त स्वरुपात कोणीही स्थापित करू शकत नाही किंवा त्याला निर्माण करता येत नाही.

ਆਪੇ ਆਪਿ ਨਿਰੰਜਨੁ ਸੋਇ ॥
तो मायेच्या पलीकडे जाऊन स्वतः प्रकाशमान असतो.

ਜਿਨਿ ਸੇਵਿਆ ਤਿਨਿ ਪਾਇਆ ਮਾਨੁ ॥
ज्याने त्याला प्रेमळ भक्तीने स्मरण केले, त्याला सन्मान मिळाला.

ਨਾਨਕ ਗਾਵੀਐ ਗੁਣੀ ਨਿਧਾਨੁ ॥
श्री गुरु नानक देवजी म्हणतात की त्या गुणांचे भांडार असलेल्या निरंकाराची पूजा केली पाहिजे.

**ਗਾਵੀਐ ਸੁਣੀਐ ਮਨਿ ਰਖੀਐ ਭਾਉ ॥**
त्याचे गुणगान गाताना आणि स्तुती ऐकताना, आपल्या अंत:करणात त्याच्याविषयी श्रद्धा ठेवा.

**ਦੁਖੁ ਪਰਹਰਿ ਸੁਖੁ ਘਰਿ ਲੈ ਜਾਇ ॥**
असे केल्याने दु:खांचा नाश होतो आणि घरात सुख-शांती राहाते.

**ਗੁਰਮੁਖਿ ਨਾਦੰ ਗੁਰਮੁਖਿ ਵੇਦੰ ਗੁਰਮੁਖਿ ਰਹਿਆ ਸਮਾਈ ॥**
गुरूंच्या मुखातून जे शब्द निघतात ते वेदांचे ज्ञान असते, तेच ज्ञान उपदेशाच्या स्वरूपात सर्वत्र असते.

**ਗੁਰੁ ਈਸਰੁ ਗੁਰੁ ਗੋਰਖੁ ਬਰਮਾ ਗੁਰੁ ਪਾਰਬਤੀ ਮਾਈ ॥**
आमच्यासाठी गुरू स्वतः भगवान शिव, विष्णू, ब्रह्मा आणि पार्वती आहेत कारण गुरु ही परम शक्ती आहे.

**ਜੇ ਹਉ ਜਾਣਾ ਆਖਾ ਨਾਹੀ ਕਹਣਾ ਕਥਨੁ ਨ ਜਾਈ ॥**
श्री गुरु नानक यांनी सांगितले आहे की परमात्म्याचे परम स्वरूप शब्दांद्वारे व्यक्त केले जाऊ शकत नाही कारण त्यांचा महिमा अमर्याद आहे आणि आपल्या सूक्ष्म बुद्धीने त्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही.

**ਗੁਰਾ ਇਕ ਦੇਹਿ ਬੁਝਾਈ ॥**
हे माझ्या गुरु! फक्त मला हे समजावून सांगा की

**ਸਭਨਾ ਜੀਆ ਕਾ ਇਕੁ ਦਾਤਾ ਸੋ ਮੈ ਵਿਸਰਿ ਨ ਜਾਈ ॥੫॥**
जो सर्व प्राणिमात्रांचा एकमेव दाता आहे त्याला मी कधीही विसरू नये. ॥५॥

**ਤੀਰਥਿ ਨਾਵਾ ਜੇ ਤਿਸੁ ਭਾਵਾ ਵਿਣੁ ਭਾਣੇ ਕਿ ਨਾਇ ਕਰੀ ॥**
तीर्थस्नान सुद्धा त्याला मान्य असेल तरच करता येते, त्या अकालपुरुषाच्या इच्छेशिवाय मी तीर्थस्नान करून काय करणार, कारण मग हे सर्व निरर्थक ठरेल.

**ਜੇਤੀ ਸਿਰਠਿ ਉਪਾਈ ਵੇਖਾ ਵਿਣੁ ਕਰਮਾ ਕਿ ਮਿਲੈ ਲਈ ॥**
जेव्हा मी त्याच्याद्वारे निर्माण केलेल्या संपूर्ण सृष्टीकडे पाहतो तेव्हा (मला हे जाणवते) त्याच्या आशीर्वादाशिवाय काहीही मिळू शकत नाही.

**ਮਤਿ ਵਿਚਿ ਰਤਨ ਜਵਾਹਰ ਮਾਣਿਕ ਜੇ ਇਕ ਗੁਰ ਕੀ ਸਿਖ ਸੁਣੀ ॥**
गुरूंकडून मिळालेले ज्ञान जर आपण आपल्या जीवनात अंगीकारले तर आपली बुद्धी हिरे-जवाहरांनी भरून जाते आणि आपले जीवनही हिरे-माणिकांसारख्या सुंदर वस्तूंनी सुशोभित होते.

ਗੁਰਾ ਇਕ ਦੇਹਿ ਬੁਝਾਈ ॥
हे माझ्या गुरु! फक्त मला हे समजावून सांगा की

ਸਭਨਾ ਜੀਆ ਕਾ ਇਕੁ ਦਾਤਾ ਸੋ ਮੈ ਵਿਸਰਿ ਨ ਜਾਈ ॥੬॥
जो सर्व प्राणिमात्रांचा एकमेव दाता आहे त्याला मी कधीही विसरू नये. ॥६॥

ਜੇ ਜੁਗ ਚਾਰੇ ਆਰਜਾ ਹੋਰ ਦਸੂਣੀ ਹੋਇ ॥
जर एखादी व्यक्ती किंवा योगी, योगाभ्यास करून, चार युगांपेक्षा दहापट अधिक म्हणजे चाळीस युगांहून अधिक आयुर्मान प्राप्त करतो.

ਨਵਾ ਖੰਡਾ ਵਿਚਿ ਜਾਣੀਐ ਨਾਲਿ ਚਲੈ ਸਭੁ ਕੋਇ ॥
तो नवखंडांमध्ये प्रसिद्ध होवो (इलाव्रत, किमपुरुष, भद्र, भरत, केतुमल, हरि, हिरण्य, राम्यक आणि कुरु पौराणिक शास्त्रात उल्लेखित), सर्वांनी त्याच्या सन्मानार्थ एकत्र चालले पाहिजे.

ਚੰਗਾ ਨਾਉ ਰਖਾਇ ਕੈ ਜਸੁ ਕੀਰਤਿ ਜਗਿ ਲੇਇ ॥
जगात एक प्रसिद्ध माणूस बनून ते आपल्या गौरवाचे गुणगान करून घेत राहील.

ਜੇ ਤਿਸੁ ਨਦਰਿ ਨ ਆਵਈ ਤ ਵਾਤ ਨ ਪੁਛੈ ਕੇ ॥
तरीही कोणीही देवाच्या कृपेशिवाय त्या व्यक्तीची काळजी घेणार नाही.

ਕੀਟਾ ਅੰਦਰਿ ਕੀਟੁ ਕਰਿ ਦੋਸੀ ਦੋਸੁ ਧਰੇ ॥
एवढी संपत्ती आणि मान-सन्मान असूनही, अशा माणसाला देवासमोर किड्यांमध्ये एक लहान कीटक समजले जाते, म्हणजे अत्यंत नीच, दोष असलेले लोकही त्याला अपराधी समजतात.

ਨਾਨਕ ਨਿਰਗੁਣਿ ਗੁਣੁ ਕਰੇ ਗੁਣਵੰਤਿਆ ਗੁਣੁ ਦੇ ॥
गुरू नानकजी म्हणतात की असीम शक्ती अयोग्य मानवांना सद्गुण प्रदान करते आणि सद्गुणी मानवांना आणखी सद्गुणी बनवते.

ਤੇਹਾ ਕੋਇ ਨ ਸੁਝਈ ਜਿ ਤਿਸੁ ਗੁਣੁ ਕੋਇ ਕਰੇ ॥੭॥
परंतु त्या गुणांनी परिपूर्ण असलेल्या परमेश्वराला कोणताही गुण देणारा दुसरा कोणीही दिसत नाही. ॥७॥

ਸੁਣਿਐ ਸਿਧ ਪੀਰ ਸੁਰਿ ਨਾਥ ॥
सिद्ध, पीर, योगी आणि नाथ इत्यादींनी परमेश्वराचे नाम श्रवण करून, म्हणजेच त्याच्या महिमाप्रती अंत:करण अर्पण करून परम दर्जा प्राप्त केला आहे.

ਸੁਣਿਐ ਧਰਤਿ ਧਵਲ ਆਕਾਸ ॥
नुसते नाव ऐकल्याने पृथ्वी, तिला धारण करणारा वृषभ (पौराणिक धर्मग्रंथानुसार, पृथ्वीला शिंगांवर धारण करणारा बैल) आणि आकाशाच्या स्थिरतेचे सामर्थ्य प्राप्त होते.

ਸੁਣਿਐ ਦੀਪ ਲੋਅ ਪਾਤਾਲ ॥
नाम ऐकल्याने शाल्मली, क्रौंच, जंबू, पलक इत्यादी सात द्वीपे, भू:, भव:, स्व: इत्यादी चौदा विश्वे आणि अतल, वितल, सुतल इत्यादी सात पाताळांची विशालता प्राप्त होते.

ਸੁਣਿਐ ਪੋਹਿ ਨ ਸਕੈ ਕਾਲੁ ॥
देवाची स्तुती ऐकून एखाद्याला मृत्यूची भीती वाटत नाही.

ਨਾਨਕ ਭਗਤਾ ਸਦਾ ਵਿਗਾਸੁ ॥
हे नानक! परमेश्वराच्या भक्तामध्ये नेहमी आनंदाचा प्रकाश असतो.

ਸੁਣਿਐ ਦੂਖ ਪਾਪ ਕਾ ਨਾਸੁ ॥੮॥
परमेश्वराचे नामस्मरण केल्याने सर्व दु:ख व दुष्कर्म नष्ट होतात. ॥८॥

ਸੁਣਿਐ ਈਸਰੁ ਬਰਮਾ ਇੰਦੁ ॥
नाम ऐकून एखाद्याला शिव, ब्रह्मा आणि इंद्र सारखे दैवी गुण प्राप्त होतात.

ਸੁਣਿਐ ਮੁਖਿ ਸਾਲਾਹਣ ਮੰਦੁ ॥
दुष्ट व्यक्ती म्हणजे वाईट कृत्ये करणारे व्यक्ती देखील नाम ऐकून स्तुतीला पात्र होतात.

ਸੁਣਿਐ ਜੋਗ ਜੁਗਤਿ ਤਨਿ ਭੇਦ ॥
परमेश्वराच्या नामाशी जुळून योगदि तसेच शरीरातील विशुद्ध, मणिपुरक, मूलाधार इत्यादी सहा चक्रांची रहस्ये समजतात.

ਸੁਣਿਐ ਸਾਸਤ ਸਿਮ੍ਰਿਤਿ ਵੇਦ ॥
देवाचे नाव ऐकून एखाद्याला पवित्र शास्त्रात वर्णन केलेले आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होते.

ਨਾਨਕ ਭਗਤਾ ਸਦਾ ਵਿਗਾਸੁ ॥
हे नानक! परमेश्वराच्या भक्तामध्ये नेहमी आनंदाचा प्रकाश असतो.

ਸੁਣਿਐ ਦੂਖ ਪਾਪ ਕਾ ਨਾਸੁ ॥੯॥
परमेश्वराची स्तुती ऐकून, सर्व दु: ख आणि पापे नाहीसे होतात.

ਸੁਣਿਐ ਸਤੁ ਸੰਤੋਖੁ ਗਿਆਨੁ ॥
परमेश्वराचे  नाम ऐकून मनुष्याला सत्यता, समाधान आणि आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होते.

ਸੁਣਿਐ ਅਠਸਠਿ ਕਾ ਇਸਨਾਨੁ ॥
परमेश्वराची स्तुती ऐकून, मनुष्य धार्मिक वृत्तीचा होतो, जणू त्याने सर्व पवित्र ठिकाणी स्नान केले आहे.

ਸੁਣਿਐ ਪੜਿ ਪੜਿ ਪਾਵਹਿ ਮਾਨੁ ॥
निरंकाराचे नाव ऐकून वारंवार रसनावर आणणाऱ्याला मनुष्याला त्याच्या दरबारात सन्मान मिळतो.

ਸੁਣਿਐ ਲਾਗੈ ਸਹਜਿ ਧਿਆਨੁ ॥
नाम ऐकल्याने मनुष्य सहज परमेश्वरामध्ये लीन होतो, कारण यामुळे आध्यात्मिक शुद्धीद्वारे ज्ञान प्राप्त होते.

ਨਾਨਕ ਭਗਤਾ ਸਦਾ ਵਿਗਾਸੁ ॥
हे नानक! परमेश्वराच्या भक्तांना आध्यात्मिक आनंदाचा प्रकाश नेहमीच असतो.

ਸੁਣਿਐ ਦੂਖ ਪਾਪ ਕਾ ਨਾਸੁ ॥੧੦॥
परमेश्वराचे नामस्मरण केल्याने सर्व दु:ख व दुष्कर्म नष्ट होतात. ॥१०॥

ਸੁਣਿਐ ਸਰਾ ਗੁਣਾ ਕੇ ਗਾਹ ॥
नाम श्रवण करून गुणांचा सागर श्री हरी यांच्यात लीन होता येते.

ਸੁਣਿਐ ਸੇਖ ਪੀਰ ਪਾਤਿਸਾਹ ॥
नाम-श्रवणाच्या प्रभावामुळेच शेख, पीर, राजा यांना त्यांच्या पदावर विराजमान आहेत.

ਸੁਣਿਐ ਅੰਧੇ ਪਾਵਹਿ ਰਾਹੁ ॥
अज्ञानी लोक परमेश्वराचे नाम श्रवण करूनच भक्तीचा मार्ग प्राप्त करू शकतात.

ਸੁਣਿਐ ਹਾਥ ਹੋਵੈ ਅਸਗਾਹੁ ॥
या भवसागराची अथांग खोली जाणून घेणे देखील नाम श्रवण करण्याच्या शक्तीने शक्य आहे.

ਨਾਨਕ ਭਗਤਾ ਸਦਾ ਵਿਗਾਸੁ ॥
हे नानक! सद्पुरुषांमध्ये नेहमी आनंदाचा प्रकाश असतो.

ਸੁਣਿਐ ਦੂਖ ਪਾਪ ਕਾ ਨਾਸੁ ॥੧੧॥
परमेश्वराचे नामस्मरण केल्याने सर्व दु:ख व दुष्कर्म नष्ट होतात. ॥११॥

ਮੰਨੇ ਕੀ ਗਤਿ ਕਹੀ ਨ ਜਾਇ ॥
त्या अकालपुरुषाचे नामस्मरण करून जो मनुष्य त्याच्यावर विश्वास ठेवतो, म्हणजेच त्याला हृदयात ठेवतो, त्याची अवस्था वर्णन करता येत नाही.

**ਜੇ ਕੋ ਕਹੈ ਪਿਛੈ ਪਛੁਤਾਇ ॥**
जो कोणी त्याच्या स्थितीचे वर्णन करतो त्याला शेवटी पश्चात्ताप करावा लागतो कारण असे करणे सोपे नाही, अशी कोणतीही रचना नाही जी नामातून प्राप्त होणारा आनंद प्रकट करू शकेल.

**ਕਾਗਦਿ ਕਲਮ ਨ ਲਿਖਣਹਾਰੁ ॥**
अशी स्थिती जरी लिहायची असली तरी ते लिहायला ना कागद आहे, ना पेन आहे , ना कुणी जिज्ञासू.

**ਮੰਨੇ ਕਾ ਬਹਿ ਕਰਨਿ ਵੀਚਾਰੁ ॥**
जो वाहेगुरुमध्ये लीन आहे त्याचा विचार करू शकतो.

**ਐਸਾ ਨਾਮੁ ਨਿਰੰਜਨੁ ਹੋਇ ॥**
परमेश्वराचे नाम सर्वश्रेष्ठ आणि मायेच्या पलीकडे आहे.

**ਜੇ ਕੋ ਮੰਨਿ ਜਾਣੈ ਮਨਿ ਕੋਇ ॥੧੨॥**
जर एखाद्याने ते आपल्या हृदयावर  कोरले आणि त्याचे  चिंतन केले.

**ਮੰਨੈ ਸੁਰਤਿ ਹੋਵੈ ਮਨਿ ਬੁਧਿ ॥**
परमेश्वराचे नाम श्रवण करून त्याचा विचार केल्याने मन आणि बुद्धीमध्ये अपार प्रेम निर्माण होते.

**ਮੰਨੈ ਸਗਲ ਭਵਣ ਕੀ ਸੁਧਿ ॥**
चिंतन केल्याने संपूर्ण सृष्टीचे ज्ञान मिळवता येते.

**ਮੰਨੈ ਮੁਹਿ ਚੋਟਾ ਨਾ ਖਾਇ ॥**
जो मनुष्य या लोकात परमेश्वराचे नामस्मरण करतो त्याला परलोकात सांसारिक संकटे किंवा यमदूतांच्या यातना सहन कराव्या लागत नाहीत.

**ਮੰਨੈ ਜਮ ਕੈ ਸਾਥਿ ਨ ਜਾਇ ॥**
जो मनुष्य परमेश्वराचे नामस्मरण करतो तो शेवटी यमाच्या दूतांसोबत नरकात जात नाही, तर देवाचे दूतच त्याला स्वर्गात घेऊन जातात. जे परमेश्वराचे नामस्मरण करतात त्यांच्यावर भगवंताची कृपा अशी असते की त्यांना यमदूतांसारखे दुष्ट सुद्धा स्पर्श करू शकत नाहीत.

**ਐਸਾ ਨਾਮੁ ਨਿਰੰਜਨੁ ਹੋਇ ॥**
परमेश्वराचे नाम सर्वश्रेष्ठ आणि मायेच्या पलीकडे आहे.

**ਜੇ ਕੋ ਮੰਨਿ ਜਾਣੈ ਮਨਿ ਕੋਇ ॥੧੩॥**
जर एखाद्याने ते आपल्या हृदयावर  कोरले आणि त्याचे चिंतन केले.

**ਮੰਨੈ ਮਾਰਗਿ ਠਾਕ ਨ ਪਾਇ ॥**
देवावर खरा विश्वास ठेवणारा त्याच्या आध्यात्मिक प्रवासात कधीही अडथळ्यांना तोंड देत नाही.

**ਮੰਨੈ ਪਤਿ ਸਿਉ ਪਰਗਟੁ ਜਾਇ ॥**
चिंतनशील मनुष्य जगात गौरवास पात्र असतो.

**ਮੰਨੈ ਮਗੁ ਨ ਚਲੈ ਪੰਥੁ ॥**
अशी व्यक्ती दुविधा किंवा सांप्रदायिकतेचा मार्ग सोडून धर्माचा मार्ग अवलंबतो.

**ਮੰਨੈ ਧਰਮ ਸੇਤੀ ਸਨਬੰਧੁ ॥**
चिंतनाचा धार्मिक कार्यांशी घट्ट संबंध आहे.

**ਐਸਾ ਨਾਮੁ ਨਿਰੰਜਨੁ ਹੋਇ ॥**
परमेश्वराचे नाम सर्वश्रेष्ठ आणि मायेच्या पलीकडे आहे.

**ਜੇ ਕੋ ਮੰਨਿ ਜਾਣੈ ਮਨਿ ਕੋਇ ॥੧੪॥**
जर एखाद्याने ते आपल्या हृदयावर कोरले आणि त्याचे चिंतन केले.

**ਮੰਨੈ ਪਾਵਹਿ ਮੋਖੁ ਦੁਆਰੁ ॥**
या संसाररुपी महासागरात मोक्षाचे एकमेव साधन म्हणजे परमेश्वराच्या नामाच्या पलीकडे नेणारी नौका, म्हणजेच मोक्ष मिळवून देणारे साधन होय.

**ਮੰਨੈ ਪਰਵਾਰੈ ਸਾਧਾਰੁ ॥**
जे चिंतन करतात ते आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना त्या नावाने आश्रय देतात.

**ਮੰਨੈ ਤਰੈ ਤਾਰੇ ਗੁਰੁ ਸਿਖ ॥**
परमेश्वराचे चिंतन करणारा केवळ स्वत:च वाचवत नाही तर गुरूच्या इतर शिष्यांनाही वाचवतो.

**ਮੰਨੈ ਨਾਨਕ ਭਵਹਿ ਨ ਭਿਖ ॥**
हे नानक! चिंतन करणारा माणूस कधीच भिकारी बनत नाही.

**ਐਸਾ ਨਾਮੁ ਨਿਰੰਜਨੁ ਹੋਇ ॥**
परमेश्वराचे नाम सर्वश्रेष्ठ आणि मायेच्या पलीकडे आहे.

**ਜੇ ਕੋ ਮੰਨਿ ਜਾਣੈ ਮਨਿ ਕੋਇ ॥੧੫॥**
जर एखाद्याने ते आपल्या हृदयावर कोरले आणि त्याचे चिंतन केले.

**ਪੰਚ ਪਰਵਾਣ ਪੰਚ ਪਰਧਾਨੁ ॥**
जे लोक खरोखरच परमेश्वराच्या आज्ञेचे पालन करतात ते पंच बनतात (देवाने मान्यता दिली) आणि ते इतरांचे नेतृत्व करतात.

**ਪੰਚੇ ਪਾਵਹਿ ਦਰਗਹਿ ਮਾਨੁ ॥**
अशा गुरुमुखांना प्रिय अकालपुरुषाच्या सभेत सम्मान मिळतो.

**ਪੰਚੇ ਸੋਹਹਿ ਦਰਿ ਰਾਜਾਨੁ ॥**
ज्या परमेश्वराच्या भक्तांनी त्याच्या नामाचे अमृत प्यायले आहे, अशा सद्पुरुष्यांना त्याच्या दरबारात परमेश्वराच्या घरी कृपा प्राप्त होते. भगवंताच्या दरबारात केवळ आपल्या नावाच्या रूपातील संपत्तीच आपल्यासोबत जाते.

**ਪੰਚਾ ਕਾ ਗੁਰੁ ਏਕੁ ਧਿਆਨੁ ॥**
सद्गुणी व्यक्तीचे लक्ष त्या एका सतगुरुमध्ये (निरंकार) स्थिर राहते.

**ਜੇ ਕੋ ਕਹੈ ਕਰੈ ਵੀਚਾਰੁ ॥**
जर कोणाला निर्मात्याबद्दल सांगायचे असेल किंवा त्याच्या निर्मितीचा हिशोब करायचा असेल तर

**ਕਰਤੇ ਕੈ ਕਰਣੈ ਨਾਹੀ ਸੁਮਾਰੁ ॥**
तो निर्माणकर्त्याची निर्मिती समजू शकत नाही.

**ਧੌਲੁ ਧਰਮੁ ਦਇਆ ਕਾ ਪੂਤੁ ॥**
निरंकाराने निर्माण केलेली सृष्टी वृषभ (धौला बैल) धर्माच्या रूपाने टिकवून आहे, जो दयेचा पुत्र आहे. (कारण मनात करुणेची भावना असेल तरच या मानवाला धार्मिक कार्य शक्य होईल)

**ਸੰਤੋਖੁ ਥਾਪਿ ਰਖਿਆ ਜਿਨਿ ਸੂਤਿ ॥**
ज्याला संतोष रुपी सूत्राने बांधले आहे.

**ਜੇ ਕੋ ਬੁਝੈ ਹੋਵੈ ਸਚਿਆਰੁ ॥**
परमेश्वराचे हे रहस्य ज्याला कळले तो सत्यवादी होऊ शकतो.

**ਧਵਲੈ ਉਪਰਿ ਕੇਤਾ ਭਾਰੁ ॥**
त्याच्यावर किती ओझे आहे, किती ओझे वाहून नेण्यास सक्षम आहे.

**ਧਰਤੀ ਹੋਰੁ ਪਰੈ ਹੋਰੁ ਹੋਰੁ ॥**
कारण या पृथ्वीतलावर निर्मात्याने जी सृष्टी निर्माण केली आहे ती सर्व गोष्टींच्या पलीकडे आहे, अनंत आहे.

**ਤਿਸ ਤੇ ਭਾਰੁ ਤਲੈ ਕਵਣੁ ਜੋਰੁ ॥**
मग त्या बैलाचा भार कोणत्या शक्तीवर अवलंबून आहे?

ਜੀਅ ਜਾਤਿ ਰੰਗਾ ਕੇ ਨਾਵ ॥
निर्मात्याच्या या सृष्टीत विविध रंग आणि नावे असलेल्या प्राण्यांच्या असंख्य प्रजाती आहेत.

ਸਭਨਾ ਲਿਖਿਆ ਵੁੜੀ ਕਲਾਮ ॥
ज्याच्या मनावर परमेश्वराच्या आज्ञेने चालणाऱ्या लेखणीने कर्माचा हिशोब लिहिला आहे.

ਏਹੁ ਲੇਖਾ ਲਿਖਿ ਜਾਣੈ ਕੋਇ ॥
पण कोणी सामान्य मनुष्याला हा कर्मलेख लिहायला सांगितला तर

ਲੇਖਾ ਲਿਖਿਆ ਕੇਤਾ ਹੋਇ ॥
त्याला  हे सुद्धा कळणार नाही की हा लिहिला जाणारा हिशोब किती मोठा असेल.

ਕੇਤਾ ਤਾਣੁ ਸੁਆਲਿਹੁ ਰੂਪੁ ॥
लिहिणाऱ्या त्या परमेश्वरामध्ये किती शक्ती असावी, त्याचे रूप किती सुंदर आहे.

ਕੇਤੀ ਦਾਤਿ ਜਾਣੈ ਕੌਣੁ ਕੂਤੁ ॥
त्याची  किती कृपा आहे याचा पुरेपूर अंदाज लावणारा कोणी नाही.

ਕੀਤਾ ਪਸਾਉ ਏਕੋ ਕਵਾਉ ॥
अकालपुरुषाच्या केवळ एका शब्दाने संपूर्ण सृष्टीचा  विस्तार झाला आहे.

ਤਿਸ ਤੇ ਹੋਏ ਲਖ ਦਰੀਆਉ ॥
त्या एका शब्दरूपी आदेशामुळेच सृष्टीतील लाखो जीवन आणि प्रणाली उदयास आली.

ਕੁਦਰਤਿ ਕਵਣ ਕਹਾ ਵੀਚਾਰੁ ॥
त्यामुळे त्या अवर्णनीय परमेश्वराच्या सामर्थ्याचा विचार करण्याइतकी बुद्धी माझ्यात नाही.

ਵਾਰਿਆ ਨ ਜਾਵਾ ਏਕ ਵਾਰ ॥
हे अनंत स्वरूप! मी इतका निर्बळ आहे की, मी तुमच्यासाठी एकदाही स्वत: ला समर्पित करण्यास सक्षम नाही.

ਜੋ ਤੁਧੁ ਭਾਵੈ ਸਾਈ ਭਲੀ ਕਾਰ ॥
तुम्हाला जे कार्य आवडते ते कार्य सर्वोश्रेष्ठ आहे.

ਤੂ ਸਦਾ ਸਲਾਮਤਿ ਨਿਰੰਕਾਰ ॥੧੬॥
हे निरंकार ! हे परब्रह्म! तू सदैव शाश्वत रूप आहेस. ॥१६॥

ਅਸੰਖ ਜਪ ਅਸੰਖ ਭਾਉ ॥
या सृष्टीतील असंख्य लोक निर्मात्याचा नामजप करतात, त्याच्यावर प्रेम करणारे असंख्य लोक आहेत.

**ਅਸੰਖ ਪੂਜਾ ਅਸੰਖ ਤਪ ਤਾਉ ॥**
असंख्य लोक त्यांची पूजा करतात, असंख्य तपस्वी तपश्चर्या करीत आहेत.

**ਅਸੰਖ ਗਰੰਥ ਮੁਖਿ ਵੇਦ ਪਾਠ ॥**
असंख्य लोक वेद आणि पवित्र पुस्तके वाचत आहेत.

**ਅਸੰਖ ਜੋਗ ਮਨਿ ਰਹਹਿ ਉਦਾਸ ॥**
असंख्य लोक योगसाधनेत तल्लीन राहून आपले मन आसक्तीपासून मुक्त ठेवतात.

**ਅਸੰਖ ਭਗਤ ਗੁਣ ਗਿਆਨ ਵੀਚਾਰ ॥**
त्या सद्गुरु निरंकाराच्या गुणांचे चिंतन करून ज्ञान प्राप्त करणारे असे असंख्य भक्त आहेत.

**ਅਸੰਖ ਸਤੀ ਅਸੰਖ ਦਾਤਾਰ ॥**
सत्य जाणणारे किंवा परोपकाराचा मार्ग अवलंबणारे असंख्य सज्जन आहेत.

**ਅਸੰਖ ਸੂਰ ਮੁਹ ਭਖ ਸਾਰ ॥**
रणांगणात शत्रूला तोंड देताना अगणित योद्धे शस्त्रास्त्रांचा मारा सहन करतात.

**ਅਸੰਖ ਮੋਨਿ ਲਿਵ ਲਾਇ ਤਾਰ ॥**
असंख्य मानव जीव मौन धारण करून एकाग्र होऊन त्या अकाल-पुरखात तल्लीन राहतात.

**ਕੁਦਰਤਿ ਕਵਣ ਕਹਾ ਵੀਚਾਰੁ ॥**
त्यामुळे त्या अवर्णनीय परमेश्वराच्या सामर्थ्याचा विचार करण्याइतकी बुद्धी माझ्यात नाही.

**ਵਾਰਿਆ ਨ ਜਾਵਾ ਏਕ ਵਾਰ ॥**
हे अनंत स्वरूप! मी इतका निर्बळ आहे की, मी तुमच्यासाठी एकदाही स्वत: ला समर्पित करण्यास सक्षम नाही.

**ਜੋ ਤੁਧੁ ਭਾਵੈ ਸਾਈ ਭਲੀ ਕਾਰ ॥**
तुम्हाला जे कार्य आवडते ते कार्य सर्वोश्रेष्ठ आहे.

**ਤੂ ਸਦਾ ਸਲਾਮਤਿ ਨਿਰੰਕਾਰ ॥੧੭॥**
हे निरंकार ! हे परब्रह्म! तू सदैव शाश्वत रूप आहेस. ॥१७॥

**ਅਸੰਖ ਮੂਰਖ ਅੰਧ ਘੋਰ ॥**
या सृष्टीतील असंख्य माणसे मूर्ख आणि अज्ञानी आहेत.

**ਅਸੰਖ ਚੋਰ ਹਰਾਮਖੋਰ ॥**
चोर आणि अभक्ष्य खाणारे असंख्य आहेत, जे चोरून दुसऱ्यांचा माल खातात.

**ਅਸੰਖ ਅਮਰ ਕਰਿ ਜਾਹਿ ਜੋਰ ॥**
असे असंख्य लोक आहेत जे कठोर आचरणाने इतरांवर अत्याचारीपणे राज्य करून या संसाराचा त्याग करतात.

**ਅਸੰਖ ਗਲਵਢ ਹਤਿਆ ਕਮਾਹਿ ॥**
असंख्य अधर्मी लोक आहेत जे इतरांचा गळा कापून  हत्येचे पाप कमावत आहेत.

**ਅਸੰਖ ਪਾਪੀ ਪਾਪੁ ਕਰਿ ਜਾਹਿ ॥**
असंख्य पापी लोक पाप करून या जगातून निघून जातात.

**ਅਸੰਖ ਕੂੜਿਆਰ ਕੂੜੇ ਫਿਰਾਹਿ ॥**
खोट्या स्वभाव असणारे असंख्य लोक खोटे बोलत फिरतात.

**ਅਸੰਖ ਮਲੇਛ ਮਲੁ ਭਖਿ ਖਾਹਿ ॥**
आपल्या घाणेरड्या मनामुळे अनैतिक वर्तन करणारे असंख्य लोक आहेत.

**ਅਸੰਖ ਨਿੰਦਕ ਸਿਰਿ ਕਰਹਿ ਭਾਰੁ ॥**
इतरांवर टीका करून असंख्य लोक पापाचे ओझे डोक्यावर घेतात.

**ਨਾਨਕੁ ਨੀਚੁ ਕਹੈ ਵੀਚਾਰੁ ॥**
श्री गुरु नानक देवांनी पापी आणि दुष्ट, अज्ञानी लोक, अभक्ष्य पदार्थांचे सेवन करणारे, दुष्ट आणि अधर्मी लोकांच्या चारित्र्याचे वर्णन करताना त्यांनी स्वतःला त्यांच्यासमोर अत्यंत तुच्छ दाखवले आहे.

**ਵਾਰਿਆ ਨ ਜਾਵਾ ਏਕ ਵਾਰ ॥**
मी एकदाच तुम्हाला स्वत: ला समर्पित करण्यास पात्र नाही.

**ਜੋ ਤੁਧੁ ਭਾਵੈ ਸਾਈ ਭਲੀ ਕਾਰ ॥**
तुम्हाला जे कार्य आवडते ते कार्य सर्वोश्रेष्ठ आहे.

**ਤੂ ਸਦਾ ਸਲਾਮਤਿ ਨਿਰੰਕਾਰ ॥੧੮॥**
हे निरंकार ! हे परब्रह्म! तू सदैव शाश्वत रूप आहेस. ॥१८॥

**ਅਸੰਖ ਨਾਵ ਅਸੰਖ ਥਾਵ ॥**
त्या निर्मात्याच्या सृष्टीमध्ये असंख्य नावांनी आणि असंख्य ठिकाणी असलेले जीव फिरत असतात; किंवा या सृष्टीमध्ये अकाल-पुरुखाची अनेक नावे आहेत आणि अनेक ठिकाणी आहेत, जिथे परमेश्वराचा वास आहे.

ਅਗੰਮ ਅਗੰਮ ਅਸੰਖ ਲੋਅ ॥
असंख्य हेच अकाल्पानिक लोक आहेत.

ਅਸੰਖ ਕਹਹਿ ਸਿਰਿ ਭਾਰੁ ਹੋਇ ॥
पण जे लोक त्याच्या निर्मितीचे गणित मांडताना 'असंख्य' हा शब्द वापरतात त्यांच्याही डोक्यावर ओझे असते.

ਅਖਰੀ ਨਾਮੁ ਅਖਰੀ ਸਾਲਾਹ ॥
शब्दांद्वारेच त्या निरंकाराचे नाम जपता येते, शब्दांद्वारेच त्याची स्तुती करता येते.

ਅਖਰੀ ਗਿਆਨੁ ਗੀਤ ਗੁਣ ਗਾਹ ॥
परमेश्वराच्या गुणांचे ज्ञानही शब्दांतून मिळू शकते आणि आणि त्याची स्तुतीसुध्दा केवळ शब्दांतून व्यक्त करता येते.

ਅਖਰੀ ਲਿਖਣੁ ਬੋਲਣੁ ਬਾਣਿ ॥
त्याची वाणी शब्दांतूनच लिहिता व बोलता येते.

ਅਖਰਾ ਸਿਰਿ ਸੰਜੋਗੁ ਵਖਾਣਿ ॥
केवळ शब्दांद्वारे एखाद्याचे नशीब स्पष्ट केले जाऊ शकते.

ਜਿਨਿ ਏਹਿ ਲਿਖੇ ਤਿਸੁ ਸਿਰਿ ਨਾਹਿ ॥
पण ज्या परमेश्वराने सर्वांचे नशीब लिहिले आहे, तो स्वतः नशिबाच्या पलीकडे आहे.

ਜਿਵ ਫੁਰਮਾਏ ਤਿਵ ਤਿਵ ਪਾਹਿ ॥
ज्याप्रमाणे अकालपुरुख मनुष्याच्या कर्मानुसार आदेश देतात, त्याचप्रमाणे तो त्याच्या कर्मांचे भोग भोगतो.

ਜੇਤਾ ਕੀਤਾ ਤੇਤਾ ਨਾਉ ॥
निर्मात्याने ही सृष्टीचा प्रसार जितका केला आहे, ती सर्व त्याची नावे आणि रूपे आहेत.

ਵਿਣੁ ਨਾਵੈ ਨਾਹੀ ਕੋ ਥਾਉ ॥
कोणालाही त्याच्या नावाशिवाय, मुळीच स्थान नाही.

ਕੁਦਰਤਿ ਕਵਣ ਕਹਾ ਵੀਚਾਰੁ ॥
त्यामुळे त्या अवर्णनीय परमेश्वराच्या सामर्थ्याचा विचार करण्याइतकी बुद्धी माझ्यात नाही.

ਵਾਰਿਆ ਨ ਜਾਵਾ ਏਕ ਵਾਰ ॥
हे अनंत स्वरूप! मी इतका निर्बळ आहे की, मी तुमच्यासाठी एकदाही स्वत: ला समर्पित करण्यास सक्षम नाही.

ਜੋ ਤੁਧੁ ਭਾਵੈ ਸਾਈ ਭਲੀ ਕਾਰ ॥
तुम्हाला जे कार्य आवडते ते कार्य सर्वोश्रेष्ठ आहे.

ਤੂ ਸਦਾ ਸਲਾਮਤਿ ਨਿਰੰਕਾਰ ॥੧੯॥
हे निरंकार ! हे परब्रह्म! तू सदैव शाश्वत रूप आहेस. ॥१९॥

ਭਰੀਐ ਹਥੁ ਪੈਰੁ ਤਨੁ ਦੇਹ ॥
हे शरीर, हात, पाय किंवा इतर कोणताही अवयव घाण झाल्यास

ਪਾਣੀ ਧੋਤੈ ਉਤਰਸੁ ਖੇਹ ॥
ती घाण पाण्याने धुतल्यास निघून जाते.

ਮੂਤ ਪਲੀਤੀ ਕਪੜੁ ਹੋਇ ॥
जर मलमूत्र इत्यादीने कोणतेही कपडे अशुद्ध झाल्यास

ਦੇ ਸਾਬੂਣੁ ਲਈਐ ਓਹੁ ਧੋਇ ॥
तर ते साबणाने धुतले जाते.

ਭਰੀਐ ਮਤਿ ਪਾਪਾ ਕੈ ਸੰਗਿ ॥
जर माणसाची बुद्धी वाईट कर्मामुळे अपवित्र झाली,

ਓਹੁ ਧੋਪੈ ਨਾਵੈ ਕੈ ਰੰਗਿ ॥
तर ती केवळ वाहेगुरुच्या नामस्मरणानेच पवित्र होऊ शकते.

ਪੁੰਨੀ ਪਾਪੀ ਆਖਣੁ ਨਾਹਿ ॥
पुण्य आणि पाप फक्त बोलण्यासाठी नाही.

ਕਰਿ ਕਰਿ ਕਰਣਾ ਲਿਖਿ ਲੈ ਜਾਹੁ ॥
तर, या जगात राहून मनुष्याने केलेल्या प्रत्येक चांगल्या-वाईट कर्मांचा तपशील धर्मराजाने पाठवलेल्या चित्र-गुप्ताद्वारे लिहिला जाईल, ज्याचा परिणाम म्हणून त्याला स्वर्ग किंवा नरक प्राप्त होईल.

ਆਪੇ ਬੀਜਿ ਆਪੇ ਹੀ ਖਾਹੁ ॥
शेवटी मनुष्य स्वतः कर्माचे बीज पेरतो आणि त्याचे फळ प्राप्त करतो.

ਨਾਨਕ ਹੁਕਮੀ ਆਵਹੁ ਜਾਹੁ ॥੨੦॥
गुरु नानक म्हणतात की, या जगात, जीवाची कर्मे त्याला जन्म-मृत्यूच्या चक्रात ठेवतील, निरंकार जीवाला त्याच्या कर्मानुसार फळ देईल. ॥२०॥

**ਤੀਰਥੁ ਤਪੁ ਦਇਆ ਦਤੁ ਦਾਨੁ ॥**
तीर्थयात्रा, तपश्चर्या, प्राणिमात्रांबद्दल करुणा आणि निःस्वार्थ दान केल्याने

**ਜੇ ਕੋ ਪਾਵੈ ਤਿਲ ਕਾ ਮਾਨੁ ॥**
जर एखादा मनुष्य सम्मान मिळवतो तर तो फारच लहान असतो.

**ਸੁਣਿਆ ਮੰਨਿਆ ਮਨਿ ਕੀਤਾ ਭਾਉ ॥**
परंतु ज्यांनी परमेश्वराचे नाम अंतःकरणात प्रेमाने ऐकले आणि सतत त्याचा विचार केला.

**ਅੰਤਰਗਤਿ ਤੀਰਥਿ ਮਲਿ ਨਾਉ ॥**
जणू त्याने आपल्या आतल्या तीर्थात स्नान करून आपली घाण दूर केली आहे.
(म्हणजेच त्या जीवाने आपल्या अंतःकरणात वसलेल्या निरंकारात लीन होऊन आपल्या अंतरात्म्याची मलिनता शुद्ध केली आहे.)

**ਸਭਿ ਗੁਣ ਤੇਰੇ ਮੈ ਨਾਹੀ ਕੋਇ ॥**
हे सर्गुण स्वरूप ! सर्व गुण तुझ्यात आहेत, माझ्यात चांगले गुण नाहीत.

**ਵਿਣੁ ਗੁਣ ਕੀਤੇ ਭਗਤਿ ਨ ਹੋਇ ॥**
नैतिकतेचे गुण अंगीकारल्याशिवाय परमेश्वराची भक्ती होऊ शकत नाही.

**ਸੁਅਸਤਿ ਆਥਿ ਬਾਣੀ ਬਰਮਾਉ ॥**
हे निरंकार ! तू सदैव विजयी होवो, तूच कल्याणकारी, ब्रह्मदेवाचे रूप आहेस.

**ਸਤਿ ਸੁਹਾਣੁ ਸਦਾ ਮਨਿ ਚਾਉ ॥**
तुम्ही सत्य, चेतना आणि नेहमी आनंदाचे मूर्त स्वरूप आहात.

**ਕਵਣੁ ਸੁ ਵੇਲਾ ਵਖਤੁ ਕਵਣੁ ਕਵਣ ਥਿਤਿ ਕਵਣੁ ਵਾਰੁ ॥**
जेव्हा परमेश्वराने या सृष्टीची निर्मिती केली तेव्हा तो कोणती वेळ, कोणता क्षण, कोणती तारीख आणि कोणता दिवस होता?

**ਕਵਣਿ ਸਿ ਰੁਤੀ ਮਾਹੁ ਕਵਣੁ ਜਿਤੁ ਹੋਆ ਆਕਾਰੁ ॥**
तेव्हा कोणता ऋतू , कोणता महिना होता ज्यावेळी या सृष्टीची निर्मिती झाली? हे सर्व कोणाला माहिती आहे?

**ਵੇਲ ਨ ਪਾਈਆ ਪੰਡਤੀ ਜਿ ਹੋਵੈ ਲੇਖੁ ਪੁਰਾਣੁ ॥**
मोठमोठे विद्वान, ऋषी-मुनी इत्यादींनाही सृष्टीची निर्मितीचा नेमका काळ कळू शकला नाही, जर त्यांना माहीत असते तर त्यांनी वेदांमध्ये किंवा धर्मग्रंथांमध्ये नक्कीच त्याचा उल्लेख केला असता.

**ਵਖਤੁ ਨ ਪਾਇਓ ਕਾਦੀਆ ਜਿ ਲਿਖਨਿ ਲੇਖੁ ਕੁਰਾਣੁ ॥**
काझींनाही या वेळेची कल्पना नव्हती, जर त्यांना माहिती असते तर त्यांनी कुराण वगैरेमध्ये नक्कीच नमूद केले असते.

**ਥਿਤਿ ਵਾਰੁ ਨਾ ਜੋਗੀ ਜਾਣੈ ਰੁਤਿ ਮਾਹੁ ਨਾ ਕੋਈ ॥**
या सृष्टीच्या निर्मितीचा दिवस, वेळ, ऋतू, महिना इत्यादी एका योगीलाही कळू शकलेले नाही.

**ਜਾ ਕਰਤਾ ਸਿਰਠੀ ਕਉ ਸਾਜੇ ਆਪੇ ਜਾਣੈ ਸੋਈ ॥**
याबद्दल, या जगाचा निर्माता स्वतः जाणून घेऊ शकतो की या सृष्टीचा प्रसार कधी झाला.

**ਕਿਵ ਕਰਿ ਆਖਾ ਕਿਵ ਸਾਲਾਹੀ ਕਿਉ ਵਰਨੀ ਕਿਵ ਜਾਣਾ ॥**
त्या अकालपुरुषाचा चमत्कार मी कसा सांगू, त्याची स्तुती कशी करू, त्याचे वर्णन कसे करू आणि त्याचे रहस्य कसे जाणू?

**ਨਾਨਕ ਆਖਣਿ ਸਭੁ ਕੋ ਆਖੈ ਇਕ ਦੂ ਇਕੁ ਸਿਆਣਾ ॥**
सद्‌गुरू म्हणतात की प्रत्येकजण इतरांपेक्षा अधिक बुद्धिमान बनून परमेश्वराची स्तुती करतो.

**ਵਡਾ ਸਾਹਿਬੁ ਵਡੀ ਨਾਈ ਕੀਤਾ ਜਾ ਕਾ ਹੋਵੈ ॥**
पण परमेश्वर महान आहे, त्याचे नाव त्याच्यापेक्षाही महान आहे, सृष्टीत जे काही घडत आहे ते त्याच्या इच्छेनुसार  घडत आहे.

**ਨਾਨਕ ਜੇ ਕੋ ਆਪੌ ਜਾਣੈ ਅਗੈ ਗਇਆ ਨ ਸੋਹੈ ॥੨੧॥**
हे नानक! त्या अपरिवर्तनीय निरांकाराचे गुणात्मक रहस्य जाणण्यात जर कोणत्याही जीवाला अभिमान वाटत असेल, तर त्याला या जगातच नाही तर परलोकात सुद्धा सम्मान मिळत नाही. ॥२१॥

**ਪਾਤਾਲਾ ਪਾਤਾਲ ਲਖ ਆਗਾਸਾ ਆਗਾਸ ॥**
सात स्वर्ग आणि सात पाताळांच्या अस्तित्वाविषयी सर्वसामान्यांच्या मनातील शंका दूर करून सद्‌गुरू म्हणतात की, सृष्टीच्या निर्मितीमध्ये लाखो पाताळ आहेत आणि लाखो स्वर्गही आहेत.

**ਓੜਕ ਓੜਕ ਭਾਲਿ ਥਕੇ ਵੇਦ ਕਹਨਿ ਇਕ ਵਾਤ ॥**
वेदांमध्ये हीच गोष्ट सांगितली आहे की शोधणारे शेवटपर्यंत शोधून थकले आहेत पण त्याचा अंत कोणालाच सापडला नाही.

**ਸਹਸ ਅਠਾਰਹ ਕਹਨਿ ਕਤੇਬਾ ਅਸੁਲੂ ਇਕੁ ਧਾਤੁ ॥**
सर्व धर्मग्रंथांमध्ये अठरा हजार जग आहेत असे सांगितले गेले आहे, परंतु प्रत्यक्षात त्यांचे मूळ एकच ईश्वर आहे जो त्यांचा निर्माता आहे.

ਲੇਖਾ ਹੋਇ ਤ ਲਿਖੀਐ ਲੇਖੈ ਹੋਇ ਵਿਣਾਸੁ ॥
त्याच्या निर्मितीच्या आकाराचा अंदाज किंवा गणना करता येत नाही आणि तो कोणत्याही मानवी गणनेच्या पलीकडे आहे.

ਨਾਨਕ ਵਡਾ ਆਖੀਐ ਆਪੇ ਜਾਣੈ ਆਪੁ ॥੨੨॥
हे नानक! या संपूर्ण जगात ज्याला महान म्हटले जाते तो निर्माता स्वतःला स्वतः जाणतो किंवा ओळखू शकतो. ॥२२॥

ਸਾਲਾਹੀ ਸਾਲਾਹਿ ਏਤੀ ਸੁਰਤਿ ਨ ਪਾਈਆ ॥
त्याची उपासना करणाऱ्या भक्तांनीही त्याची स्तुती करून त्याची परिसीमा गाठली नाही.

ਨਦੀਆ ਅਤੈ ਵਾਹ ਪਵਹਿ ਸਮੁੰਦਿ ਨ ਜਾਣੀਅਹਿ ॥
ज्याप्रमाणे नद्या-नाले समुद्रात विलीन होतात तेव्हा त्याच्या अथांग अंतापर्यंत पोहोचू शकत नाहीत, उलट त्यांचे अस्तित्वही गमावून बसतात, त्याचप्रमाणे स्तुती करणारेही स्तुती करता-करता त्याच्यात लीन होतात.

ਸਮੁੰਦ ਸਾਹ ਸੁਲਤਾਨ ਗਿਰਹਾ ਸੇਤੀ ਮਾਲੁ ਧਨੁ ॥
समुद्राचे राजे आणि सम्राट, पर्वताएवढी अतुलनीय संपत्तीचे मालक असूनही,

ਕੀੜੀ ਤੁਲਿ ਨ ਹੋਵਨੀ ਜੇ ਤਿਸੁ ਮਨਹੁ ਨ ਵੀਸਰਹਿ ॥੨੩॥
ते त्या मुंगीसारखे झाले नसते, जर त्यांच्या मनात देवाचा विसर पडला नसता. ॥२३॥

ਅੰਤੁ ਨ ਸਿਫਤੀ ਕਹਣਿ ਨ ਅੰਤੁ ॥
त्या निरंकाराच्या स्तुतीला मर्यादा नाही आणि त्याची स्तुती शब्दांनीही संपू शकत नाही.

ਅੰਤੁ ਨ ਕਰਣੈ ਦੇਣਿ ਨ ਅੰਤੁ ॥
त्याच्या निर्मितीचा अंत नाही, त्याच्या भेटींचा अंत नाही.

ਅੰਤੁ ਨ ਵੇਖਣਿ ਸੁਣਣਿ ਨ ਅੰਤੁ ॥
त्याच्या पाहण्याचा आणि श्रवणाचा अंत नाही, म्हणजेच तो निरंकार सर्व-द्रष्टा आणि सर्वश्रोता आहे.

ਅੰਤੁ ਨ ਜਾਪੈ ਕਿਆ ਮਨਿ ਮੰਤੁ ॥
परमेश्वराच्या अंतःकरणात रहस्य काय आहे, ते देखील समजू शकत नाही.

ਅੰਤੁ ਨ ਜਾਪੈ ਕੀਤਾ ਆਕਾਰੁ ॥
या सृष्टीच्या निर्मितीचा कालावधी किंवा व्याप्ती कळू शकत नाही.

ਅੰਤੁ ਨ ਜਾਪੈ ਪਾਰਾਵਾਰੁ ॥
त्याची निर्मिती कोठे सुरू होते आणि ती कुठे संपते हे जाणून घेणे अशक्य आहे.

ਅੰਤ ਕਾਰਣਿ ਕੇਤੇ ਬਿਲਲਾਹਿ ॥
त्याचा अंत व्हावा म्हणून अनेक जीव रडत फिरत आहेत.

ਤਾ ਕੇ ਅੰਤ ਨ ਪਾਏ ਜਾਹਿ ॥
पण त्या अथांग, शाश्वत अकालपुरुषाचा अंत सापडत नाही.

ਏਹੁ ਅੰਤੁ ਨ ਜਾਣੈ ਕੋਇ ॥
त्यांच्या गुणांचा अंत कुठे होते हे कोणीच सांगू शकत नाही.

ਬਹੁਤਾ ਕਹੀਐ ਬਹੁਤਾ ਹੋਇ ॥
त्या परब्रह्माची जितकी प्रशंसा, स्तुती, रूप किंवा गुण सांगितले जातात तितके ते अधिक होत जातात.

ਵਡਾ ਸਾਹਿਬੁ ਊਚਾ ਥਾਉ ॥
निरंकार सर्वश्रेष्ठ, त्याचे स्थान सर्वोच्च आहे.

ਊਚੇ ਉਪਰਿ ਊਚਾ ਨਾਉ ॥
पण त्या सर्वश्रेष्ठ निरंकाराचे नाव सर्वश्रेष्ठ आहे.

ਏਵਡੁ ਊਚਾ ਹੋਵੈ ਕੋਇ ॥
जर कोणतीही शक्ती त्यापेक्षा मोठी किंवा महान असेल तर

ਤਿਸੁ ਊਚੇ ਕਉ ਜਾਣੈ ਸੋਇ ॥
केवळ तीच  शक्ती त्या सर्वोच्च गुरुला जाणू शकते.

ਜੇਵਡੁ ਆਪਿ ਜਾਣੈ ਆਪਿ ਆਪਿ ॥
निरंकार स्वतः सर्व काही जाणतो किंवा जाणू शकतो, इतर कोणी नाही.

ਨਾਨਕ ਨਦਰੀ ਕਰਮੀ ਦਾਤਿ ॥੨੪॥
सतगुरु नानक देव म्हणतात की ते जीवांवर दया करतात आणि त्यांना त्यांच्या कर्मानुसार सर्व गोष्टी प्रदान करतात. ॥२४॥

ਬਹੁਤਾ ਕਰਮੁ ਲਿਖਿਆ ਨਾ ਜਾਇ ॥
त्यांचे आशीर्वाद इतके असंख्य आहेत की ते लिहिण्याची क्षमता कोणामध्येही नाही.

ਵਡਾ ਦਾਤਾ ਤਿਲੁ ਨ ਤਮਾਇ ॥
तो महान आहे कारण तो पुष्कळ आशीर्वाद देतो पण त्याच्यात कोणत्याही गोष्टीचा लोभही नाही.

**ਕੇਤੇ ਮੰਗਹਿ ਜੋਧ ਅਪਾਰ ॥**
असंख्य योद्धे त्याच्या कृपेसाठी तळमळत आहेत.

**ਕੇਤਿਆ ਗਣਤ ਨਹੀ ਵੀਚਾਰੁ ॥**
असे मागणारे असंख्य लोक आहेत. त्यांची गणना करणे अशक्य आहे

**ਕੇਤੇ ਖਪਿ ਤੁਟਹਿ ਵੇਕਾਰ ॥**
अनेक मानवांनी निरांकाराद्वारे प्रदान केलेले पदार्थांचा उपभोग घेऊन स्वतःला बेकार बनवतात.

**ਕੇਤੇ ਲੈ ਲੈ ਮੁਕਰੁ ਪਾਹਿ ॥**
अनेक लोक अकालपुरुषांनी दिलेल्या वस्तू घेऊनही नकार देतात.

**ਕੇਤੇ ਮੂਰਖ ਖਾਹੀ ਖਾਹਿ ॥**
पुष्कळ मूर्ख लोक परमेश्वराकडून वस्तू घेतात आणि खातात, परंतु त्याचे नामस्मरण कधीच करत नाहीत.

**ਕੇਤਿਆ ਦੂਖ ਭੂਖ ਸਦ ਮਾਰ ॥**
बरेच लोक नेहमी दु: ख आणि भुकेने ग्रस्त असतात कारण ते त्यांच्या कर्मांमध्ये लिहिलेले असते.

**ਏਹਿ ਭਿ ਦਾਤਿ ਤੇਰੀ ਦਾਤਾਰ ॥**
पण सज्जन लोक अशा माराला परमेश्वराचा आशीर्वाद मानतात.

**ਬੰਦਿ ਖਲਾਸੀ ਭਾਣੈ ਹੋਇ ॥**
या दुःखांमुळेच मानवाला वाहेगुरुचे स्मरण होते.

**ਹੋਰੁ ਆਖਿ ਨ ਸਕੈ ਕੋਇ ॥**
परमेश्वराच्या आज्ञेत राहूनच मनुष्याला मायेच्या बंधनातून मुक्ती मिळू शकते.

**ਜੇ ਕੋ ਖਾਇਕੁ ਆਖਣਿ ਪਾਇ ॥**
परमेश्वराच्या आज्ञेत राहण्याखेरीज मायेच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी दुसरी कोणतीही पद्धत कोणी सांगू शकत नाही.

**ਓਹੁ ਜਾਣੈ ਜੇਤੀਆ ਮੁਹਿ ਖਾਇ ॥**
अज्ञानापोटी एखाद्याने त्याबद्दल बोलण्याचा प्रयत्न केला तरच त्याला कळेल की यमाकडून त्याच्या तोंडावर किती आघात झाले आहेत.

**ਆਪੇ ਜਾਣੈ ਆਪੇ ਦੇਇ ॥**
परमेश्वर सृष्टीतील सर्व सजीवांच्या गरजा जाणतो आणि त्यांना स्वतः पुरवतो.

**ਆਖਹਿ ਸਿ ਭਿ ਕੇਈ ਕੇਇ ॥**
सृष्टीतील सर्व प्राणीच कृतघ्न आहेत असे नाही तर असे अनेक लोक जे परमेश्वराच्या आदेशाला मान्य करतात.

**ਜਿਸ ਨੋ ਬਖਸੇ ਸਿਫਤਿ ਸਾਲਾਹ ॥**
परमेश्वर ज्याच्यावर प्रसन्न होतो, तो त्याला त्याचे गुणगान गाण्याची शक्ती देतो.

**ਨਾਨਕ ਪਾਤਿਸਾਹੀ ਪਾਤਿਸਾਹੁ ॥੨੫॥**
हे नानक! तो राजांचा राजाही होतो; म्हणजेच त्याला उच्च आणि चांगले पद प्राप्त होते. ॥ २५ ॥

**ਅਮੁਲ ਗੁਣ ਅਮੁਲ ਵਾਪਾਰ ॥**
निरंकाराचे जे गुण व्यक्त करता येत नाहीत ते अमूल्य आहेत आणि या निरंकाराचे स्मरण करणे हा अमूल्य व्यवसाय आहे.

**ਅਮੁਲ ਵਾਪਾਰੀਏ ਅਮੁਲ ਭੰਡਾਰ ॥**
सिमरनच्या (गुरुमुखी) रूपाने या व्यवसायाचे मार्गदर्शन करणारे संत हेही अमूल्य व्यापारी आहेत आणि त्या संतांच्या अंगी असलेले सद्गुणांचे भांडारही अमूल्य आहे.

**ਅਮੁਲ ਆਵਹਿ ਅਮੁਲ ਲੈ ਜਾਹਿ ॥**
या संतांकडे जे लोक परमेश्वराला भेटायला येतात तेही अमूल्य असतात आणि ते त्यांच्याकडून गुण घेऊन जातात तेही अमूल्य असतात.

**ਅਮੁਲ ਭਾਇ ਅਮੁਲਾ ਸਮਾਹਿ ॥**
गुरू आणि शीख यांच्यातील परस्पर प्रेम अमूल्य आहे, गुरूच्या प्रेमातून आत्म्याला मिळणारा आनंदही अमूल्य आहे.

**ਅਮੁਲੁ ਧਰਮੁ ਅਮੁਲੁ ਦੀਬਾਣੁ ॥**
अकालपुरुषाचा न्यायही अमूल्य आहे, त्याचा न्यायालय म्हणजे दरबारही अमूल्य आहे.

**ਅਮੁਲੁ ਤੁਲੁ ਅਮੁਲੁ ਪਰਵਾਣੁ ॥**
अकालपुरुषाचा  न्याय करणारा तराजू अमूल्य आहे, तसेच सजीवांच्या चांगल्या-वाईट कर्मांचे वजन करण्यासाठी वापरले जाणारे परिमाणही अमूल्य आहे.

**ਅਮੁਲੁ ਬਖਸੀਸ ਅਮੁਲੁ ਨੀਸਾਣੁ ॥**
अकालपुरुषाने दिलेल्या वस्तूही अमूल्य आहेत आणि त्या वस्तूंचे प्रतीकही अमूल्य आहे.

**ਅਮੁਲੁ ਕਰਮੁ ਅਮੁਲੁ ਫੁਰਮਾਣੁ ॥**
निरंकाराची सजीवांप्रती असलेली दयाही अमूल्य आहे आणि त्यांचे आदेशही अमूल्य आहेत.

**ਅਮੁਲੋ ਅਮੁਲੁ ਆਖਿਆ ਨ ਜਾਇ ॥**
तो परमेश्वर अमूल्य आहे, त्याचे आत्मीयतेने वर्णन करणे अशक्य आहे.

**ਆਖਿ ਆਖਿ ਰਹੇ ਲਿਵ ਲਾਇ ॥**
पण तरीही अनेक भक्त त्याच्या गुणांचे वर्णन करून भूतकाळात, भविष्यकाळात आणि वर्तमानकाळात त्याच्यात लीन होत आहेत.

**ਆਖਹਿ ਵੇਦ ਪਾਠ ਪੁਰਾਣ ॥**
चार वेद आणि अठरा पुराणातही त्यांचा महिमा सांगितला आहे.

**ਆਖਹਿ ਪੜੇ ਕਰਹਿ ਵਖਿਆਣ ॥**
विद्वान त्याच्याविषयी बोलतात आणि त्यांचे वर्णन करण्यासाठी प्रवचन देतात.

**ਆਖਹਿ ਬਰਮੇ ਆਖਹਿ ਇੰਦ ॥**
सृष्टी निर्माता ब्रह्मा आणि देवराज इंद्र देखील त्याच्या अमूल्य गुणांबद्दल बोलतात.

**ਆਖਹਿ ਗੋਪੀ ਤੈ ਗੋਵਿੰਦ ॥**
गिरीधर गोपाळ कृष्ण आणि त्यांच्या गोपीही त्या निरंकाराची स्तुती करतात.

**ਆਖਹਿ ਈਸਰ ਆਖਹਿ ਸਿਧ ॥**
महादेव आणि गोरख सारखे सिद्ध देखील त्याच्या कीर्तीचे गुणगान करतात.

**ਆਖਹਿ ਕੇਤੇ ਕੀਤੇ ਬੁਧ ॥**
निर्मात्याने या जगात निर्माण केलेले सर्व बुद्धिमान प्राणी देखील त्याच्या कीर्तीचे गुणगान करतात.

**ਆਖਹਿ ਦਾਨਵ ਆਖਹਿ ਦੇਵ ॥**
सर्व दानव आणि देव देखील त्याची स्तुती करतात.

**ਆਖਹਿ ਸੁਰਿ ਨਰ ਮੁਨਿ ਜਨ ਸੇਵ ॥**
जगातील सर्व सद्पुरुष, मानव, नारद, ऋषी आणि इतर भक्त त्यांचे गुणगान गातात.

**ਕੇਤੇ ਆਖਹਿ ਆਖਣਿ ਪਾਹਿ ॥**
बरेच लोक त्याचे  वर्णन करीत आहेत आणि बरेच लोक त्यांच्या क्षमतेनुसार देवाच्या गुणांचे वर्णन करणार आहेत.

**ਕੇਤੇ ਕਹਿ ਕਹਿ ਉਠਿ ਉਠਿ ਜਾਹਿ ॥**
पुष्कळ लोक देवाच्या गुणांबद्दल वारंवार बोलता-बोलता या जगातून निघून जातात.

ਏਤੇ ਕੀਤੇ ਹੋਰਿ ਕਰੇਹਿ ॥
ही जितक्या प्रकारची सृष्टी त्याने निर्माण केली आहे, इतकी जरी पुन्हा निर्माण केली,

ਤਾ ਆਖਿ ਨ ਸਕਹਿ ਕੇਈ ਕੇਇ ॥
तरीही, ते त्याच्या गुणांचे पूर्णपणे वर्णन करू शकणार नाहीत.

ਜੇਵਡੁ ਭਾਵੈ ਤੇਵਡੁ ਹੋਇ ॥
परमेश्वराची महानता त्याच्या इच्छेनुसार वाढते आणि कमी होते.

ਨਾਨਕ ਜਾਣੈ ਸਾਚਾ ਸੋਇ ॥
श्री गुरु नानक म्हणतात की तो सत्य स्वरूप निरंकाराच आपल्या अमूल्य गुणांना जाणतो.

ਜੇ ਕੋ ਆਖੈ ਬੋਲੁਵਿਗਾੜੁ ॥
जर कोणी अहंकारी म्हणाला की तो किती मोठा आहे,

ਤਾ ਲਿਖੀਐ ਸਿਰਿ ਗਾਵਾਰਾ ਗਾਵਾਰੁ ॥੨੬॥
तर त्याला महामूर्ख समजले जाते. ॥२६॥

ਸੋ ਦਰੁ ਕੇਹਾ ਸੋ ਘਰੁ ਕੇਹਾ ਜਿਤੁ ਬਹਿ ਸਰਬ ਸਮਾਲੇ ॥
त्या रक्षक परमेश्वराचे दार आणि घर कसे आहे, जिथे तो बसून संपूर्ण सृष्टीचा सांभाळ करतो?

ਵਾਜੇ ਨਾਦ ਅਨੇਕ ਅਸੰਖਾ ਕੇਤੇ ਵਾਵਣਹਾਰੇ ॥
(येथे सद्गुरुजी त्यांच्या निवृत्तीच्या वेळी या प्रश्नाचे उत्तर देतात) हे मानव! त्याच्या दारात असंख्य प्रकारची वाद्ये आहेत आणि अनेक लोक ती वाद्ये वाजवत आहेत.

ਕੇਤੇ ਰਾਗ ਪਰੀ ਸਿਉ ਕਹੀਅਨਿ ਕੇਤੇ ਗਾਵਣਹਾਰੇ ॥
तेथे अनेक राग आहेत आणि राग गाणारे ही असंख्य लोक आहेत. सर्व आपापल्या पद्धतीने तुझे गुणगान गात आहेत.

ਗਾਵਹਿ ਤੁਹਨੋ ਪਉਣੁ ਪਾਣੀ ਬੈਸੰਤਰੁ ਗਾਵੈ ਰਾਜਾ ਧਰਮੁ ਦੁਆਰੇ ॥
वारा, पाणी आणि अग्नि देवता त्या निरंकाराचे गुणगान गात आहेत आणि सर्व प्राणिमात्रांच्या कृतींचे विश्लेषक धर्मराजही त्याच्या दारात उभे राहून त्याची महिमा गात आहेत.

ਗਾਵਹਿ ਚਿਤੁ ਗੁਪਤੁ ਲਿਖਿ ਜਾਣਹਿ ਲਿਖਿ ਲਿਖਿ ਧਰਮੁ ਵੀਚਾਰੇ ॥
सजीवांनी केलेल्या कर्माविषयी लिहिणारा चित्र-गुप्तही त्या अकाल-पुरुषाचे गुणगान गातो आणि धर्मराजा चित्र-गुप्ताने लिहिलेल्या शुभ-अशुभ कर्माचा विचार करतो.

ਗਾਵਹਿ ਈਸਰੁ ਬਰਮਾ ਦੇਵੀ ਸੋਹਨਿ ਸਦਾ ਸਵਾਰੇ ॥
तुझ्याद्वारे निर्मित शिव, ब्रह्मा आणि त्यांच्या देवी (शक्ती) हे सर्व तुझेच गुणगान करत आहेत

**ਗਾਵਹਿ ਇੰਦ ਇਦਾਸਣਿ ਬੈਠੇ ਦੇਵਤਿਆ ਦਰਿ ਨਾਲੇ ॥**
हे निरंकार ! सर्व देव आणि  सिंहासनावर बसलेला स्वर्गाचा अधिपती इंद्र इतर देवतांसह तुझ्या दारात उभे राहून तुझे गुणगान गात आहे.

**ਗਾਵਹਿ ਸਿਧ ਸਮਾਧੀ ਅੰਦਰਿ ਗਾਵਨਿ ਸਾਧ ਵਿਚਾਰੇ ॥**
कर्तृत्ववान लोक समाधीत असताना तुझी स्तुती करतात, विचारी ऋषी विवेकाने तुझी स्तुती करतात.

**ਗਾਵਨਿ ਜਤੀ ਸਤੀ ਸੰਤੋਖੀ ਗਾਵਹਿ ਵੀਰ ਕਰਾਰੇ ॥**
यती, सती आणि समाधानी लोकही तुझे गुणगान गातात तसेच पराक्रमी योद्धेही तुझे गुणगान करतात.

**ਗਾਵਨਿ ਪੰਡਿਤ ਪੜਨਿ ਰਖੀਸਰ ਜੁਗੁ ਜੁਗੁ ਵੇਦਾ ਨਾਲੇ ॥**
जगातील सर्व विद्वान आणि महान जितेंद्रिय ऋषी युगानुयुगे वेदांचा अभ्यास करून त्या अकालपुरुषाची स्तुती करत आहेत.

**ਗਾਵਹਿ ਮੋਹਣੀਆ ਮਨੁ ਮੋਹਨਿ ਸੁਰਗਾ ਮਛ ਪਇਆਲੇ ॥**
मन मोहून टाकणाऱ्या सर्व सुंदर स्त्रिया स्वर्ग, मृत्यू आणि नरकात तुझे गुणगान गात आहेत.

**ਗਾਵਨਿ ਰਤਨ ਉਪਾਏ ਤੇਰੇ ਅਠਸਠਿ ਤੀਰਥ ਨਾਲੇ ॥**
निरंकाराने निर्माण केलेली चौदा रत्ने, जगातील अडुसष्ठ तीर्थक्षेत्रे आणि त्यात उपस्थित संतही त्याचे गुणगान गातात.

**ਗਾਵਹਿ ਜੋਧ ਮਹਾਬਲ ਸੂਰਾ ਗਾਵਹਿ ਖਾਣੀ ਚਾਰੇ ॥**
सर्व योद्धे, पराक्रमी पुरुष आणि शूर पुरुष अकालपुरुषाची स्तुती करतात, उत्पत्तीचे चार स्त्रोत (अण्डज, जरायुज, स्वेदज व उदभिज्ज) देखील त्याची स्तुती करतात.

**ਗਾਵਹਿ ਖੰਡ ਮੰਡਲ ਵਰਭੰਡਾ ਕਰਿ ਕਰਿ ਰਖੇ ਧਾਰੇ ॥**
नवखंड, मंडल आणि संपूर्ण ब्रम्हांड, ज्या निर्मात्याने निर्माण केले आहे आणि धारण केले आहे, ते सर्व तुझे गुणगान गातात.

**ਸੇਈ ਤੁਧੁਨੋ ਗਾਵਹਿ ਜੋ ਤੁਧੁ ਭਾਵਨਿ ਰਤੇ ਤੇਰੇ ਭਗਤ ਰਸਾਲੇ ॥**
साक्षात जे तुझ्या भक्तीत लीन आहेत, जे तुझ्या नामात रमलेले आहेत आणि जे तुझ्या नावाचे रसिक आहेत, तेच तुझे गुणगान गाऊ शकतात.

**ਹੋਰਿ ਕੇਤੇ ਗਾਵਨਿ ਸੇ ਮੈ ਚਿਤਿ ਨ ਆਵਨਿ ਨਾਨਕੁ ਕਿਆ ਵੀਚਾਰੇ ॥**
असे असंख्य आणखी जीव मला आठवत नाही आहेत, जे तुझी स्तुती करतात.  हे नानक ! मी त्या जीवांची गणना म्हणजे विचार कुठे पर्यंत करू.

**ਸੋਈ ਸੋਈ ਸਦਾ ਸਚੁ ਸਾਹਿਬੁ ਸਾਚਾ ਸਾਚੀ ਨਾਈ ॥**
त्या सत्यस्वरूप अकालपुरुषाचे अस्तित्त्व भूतकाळातही होते, या सद्गुणी निरांकाराचे अस्तित्त्व वर्तमानकाळातही राहील.

**ਹੈ ਭੀ ਹੋਸੀ ਜਾਇ ਨ ਜਾਸੀ ਰਚਨਾ ਜਿਨਿ ਰਚਾਈ ॥**
तो सदैव भविष्यात असेल, तो निर्माता परमेश्वर ना जन्म घेत, तसेच त्याचा नाशही कधी होत नाही.

**ਰੰਗੀ ਰੰਗੀ ਭਾਤੀ ਕਰਿ ਕਰਿ ਜਿਨਸੀ ਮਾਇਆ ਜਿਨਿ ਉਪਾਈ ॥**
सृष्टीचा निर्माता ईश्वराने आपल्या मायाजालातून रंगीबेरंगी, विविध आकाराचे आणि असंख्य सजीवांची निर्मिती केली आहे.

**ਕਰਿ ਕਰਿ ਵੇਖੈ ਕੀਤਾ ਆਪਣਾ ਜਿਵ ਤਿਸ ਦੀ ਵਡਿਆਈ ॥**
आपल्या या उत्पतीला करून-करून तो आपल्या आवडीनुसारच बघतो म्हणजेच त्याच्या इच्छेनुसार त्यांची काळजी घेतो.

**ਜੋ ਤਿਸੁ ਭਾਵੈ ਸੋਈ ਕਰਸੀ ਹੁਕਮੁ ਨ ਕਰਣਾ ਜਾਈ ॥.**
त्या अकालपुरुषाला जे काही काम चांगले वाटेल ते तो करतो आणि भविष्यातही करील, त्याला ते करण्याची आज्ञा देणारा त्याच्यासारखा कोणी नाही.

**ਸੋ ਪਾਤਿਸਾਹੁ ਸਾਹਾ ਪਾਤਿਸਾਹਿਬੁ ਨਾਨਕ ਰਹਣੁ ਰਜਾਈ ॥੨੭॥**
गुरु नानक  म्हणतात की हे मानवा! तो देवाच्या राजांचा राजा म्हणजेच सम्राट आहे, त्याच्या आज्ञेत राहणेच  योग्य आहे. ॥ २७ ॥

**ਮੁੰਦਾ ਸੰਤੋਖੁ ਸਰਮੁ ਪਤੁ ਝੋਲੀ ਧਿਆਨ ਕੀ ਕਰਹਿ ਬਿਭੂਤਿ ॥**
गुरुजी म्हणतात, हे मानव योगी! तू संतोष रुपी मुद्रा, दुष्कर्मातून लज्जेचे पात्र, पापमुक्त राहून इहलोक आणि परलोकात टिकवता येईल असा प्रतिष्ठेचा झगा अंगीकारून भगवंताच्या नामस्मरणाच्या तेजाने शरीर सुशोभित ठेवा.

**ਖਿੰਥਾ ਕਾਲੁ ਕੁਆਰੀ ਕਾਇਆ ਜੁਗਤਿ ਡੰਡਾ ਪਰਤੀਤਿ ॥**
मृत्यूचे स्मरण करणे तुझ्या मांडीवर झोपल्यासारखे आहे, शरीर शुद्ध ठेवणे ही योगाची युक्ती आहे, अकालपुरुषावरील तुमची दृढ श्रद्धा ही त्याची काठी आहे. हे सर्व सद्गुण अंगीकारणे हेच योग्याचे खरे रूप आहे.

**ਆਈ ਪੰਥੀ ਸਗਲ ਜਮਾਤੀ ਮਨਿ ਜੀਤੈ ਜਗੁ ਜੀਤੁ ॥**
तुम्ही जगातील सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करावे, म्हणजेच त्यांचे सुख-दु:ख स्वतःचे समजून अनुभवावे, हा तुमचा सर्वोत्तम पंथ (योगींचा सर्वोत्तम पंथ) आहे. वासनेसारख्या दुर्गुणांपासून मनावर विजय मिळवणे म्हणजे जग जिंकण्यासारखे आहे.

**ਆਦੇਸੁ ਤਿਸੈ ਆਦੇਸੁ ॥**
नमस्कार आहे, त्या केवळ त्या  सगुण स्वरूप निरंकारालाच नमस्कार आहे.

**ਆਦਿ ਅਨੀਲੁ ਅਨਾਦਿ ਅਨਾਹਤਿ ਜੁਗੁ ਜੁਗੁ ਏਕੋ ਵੇਸੁ ॥੨੮॥**
जो सर्वांचे मूळ, रंगहीन, पवित्र स्वरूप, आदि रहित, अनश्वर व अपरिवर्तनीय स्वरूप आहे. ॥२८॥

**ਭੁਗਤਿ ਗਿਆਨੁ ਦਇਆ ਭੰਡਾਰਣਿ ਘਟਿ ਘਟਿ ਵਾਜਹਿ ਨਾਦ ॥**
